**युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष आणि युरोपियन आयोगाच्या अध्यक्षा अधिकृत भारत भेटीवर (25-27 जानेवारी 2026)**

15 जानेवारी 2026

माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या निमंत्रणावरून युरोपियन कौन्सिलचे महामहिम अध्यक्ष श्री अँटोनियो लुईस सॅन्टोस दा कोस्टा आणि युरोपियन आयोगाच्या अध्यक्षा महामहिम श्रीमती उर्सुला व्हॉन डेर लेयेन या 25-27 जानेवारी 2026 पासून भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या 77व्या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून औपचारिक भारत भेटीवर असतील. या दौऱ्यादरम्यान उभय नेते हे 27 जानेवारी 2026 रोजी होणाऱ्या 16 व्या भारत–युरोपियन संघ शिखर परिषदेचे सह-अध्यक्षपद भूषवतील.

2. या दौऱ्यादरम्यान अध्यक्ष कोस्टा आणि अध्यक्ष वॉन डेर लेन हे आदरणीय राष्ट्रपती यांची भेट घेतील तसेच पंतप्रधान मोदी यांच्या समवेत खासगी आणि शिष्टमंडळ स्तरीय चर्चा करतील. भारत–EU शिखर परिषदेच्या अनुषंगाने भारत–EU बिझनेस फोरमचे आयोजन होण्याचीही अपेक्षा आहे.

3. भारत आणि युरोपियन युनियन 2004 पासून धोरणात्मक भागीदार आहेत. 15 जुलै 2020 रोजी 15 व्या भारत-EU शिखर परिषदेचे आभासी पद्धतीने आयोजन करण्यात आले होते. विशेषतः फेब्रुवारी 2025 मध्ये युरोपियन संघ आयोग सदस्यांच्या ऐतिहासिक भारत दौऱ्यानंतर द्विपक्षीय संबंध विविध क्षेत्रांमध्ये अधिक व्यापक आणि दृढ झाले आहेत.

4. 77 व्या प्रजासत्ताक दिनाचे प्रमुख अतिथी म्हणून EU नेत्यांचा सहभाग आणि 16 व्या भारत–युरोपियन संघ शिखर परिषदेमुळे भारत–EU धोरणात्मक भागीदारी अधिक बळकट होईल तसेच परस्पर हितसंबंधांच्या प्राधान्य क्षेत्रांतील सहकार्याला पुढे चालना मिळेल.

**नवी दिल्ली**

15 जानेवारी 2026